दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे     सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स



संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १६९ । सोमवार २३ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

## शिक्षक समाजाचे खरे शिल्पकार - आमदार काशिनाथ दाते

### अ.नगर डिस्ट्रिक्ट से. टीचर्स को-ऑप. क्रे. सो.च्या वतीने सेवानिवृत्त कृतज्ञता सोहळा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** अ.नगर डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी, शाखा पारनेर यांच्या वतीने आयोजित कृतज्ञता सोहळा, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शहीद जवान मदत निधी उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी जी.एस. महानगर को-ऑपरेटर्स बँकेच्या अध्यक्षा गितांजलीताई शेळके, अ.जि.म. वि. प्र.स. डॉ. भाऊसाहेब खिलारी, चेअरमन आप्पासाहेब शिंदे, एस.डी. आंधळे, व्हा. चेअरमन अर्जुनराव वाकळे, संचालक महेंद्र हिंगे,वर्षा खिलारी, वैशाली दारकुंडे, विजय पठारे, उमेश गुंजाळ, सुधीर कानवडे, किशोर धुमाळ, आप्पासाहेब जगताप, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे इ. मान्यवर व संस्थेचे सभासद, पाल्य व स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार दाते सरांनी माध्यमिक शिक्षकांच्या कार्याचे मनापासून कौतुक करताना सांगितले की, ''माध्यमिक शिक्षक हे समाजाचा कणा असून ते केवळ ज्ञान देत नाहीत, तर विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, टीकात्मक विचार आणि सामाजिक जबाबदारी रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. किशोरवयीन अवस्थेत असलेल्या विद्यार्थ्यांना योग्य-अयोग्य याची जाणीव करून देत त्यांना सुसंस्कृत व जबाबदार नागरिक बनवण्यामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत मोलाची आहे.''

ते पुढे म्हणाले की, शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, शिस्त, सहकार्य आणि समानतेची भावना निर्माण करतात. विविध पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्यांना एकत्र आणून सामाजिक एकतेचा संदेश देण्याचे काम शिक्षक करत असतात. केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करण्याची क्षमता, समस्या सोडवण्याची कौशल्ये आणि भविष्यातील योग्य निर्णय घेण्याची ताकद देण्याचे कामही शिक्षक करत असतात. त्यामुळे शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असून त्यांच्या हातूनच देशाचा सक्षम नागरिक घडतो. शासनाच्या सोयीसुविधांबाबत व्यक्त झालेल्या नाराजीवर आमदार दाते सर म्हणाले की, ''शासन विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करत आहे. शिक्षण, पायाभूत सुविधा, आरोग्य, शेतकरी कल्याण यांसाठी अनेक योजना राबवल्या जात आहेत. अलीकडेच अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला असून त्याला मदत करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अशा आपत्तींचाही आर्थिक भार सांभाळत शासनाला विविध क्षेत्रांचा समतोल राखावा लागतो.'' तसेच त्यांनी नमूद ■ पान ४ वर

## खरातच्या कौतुकासंदर्भात पोपटराव पवारांचे स्पष्टीकरण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** हिवरेबाजारचे सरपंच पोपटराव पवार यांच्याकडून एका कार्यक्रमात अशोक खरातचं गुणगान गातानाचा व्हिडिओ चर्चेत आला आहे. 'ओशनोलॉजीचा परदेशात चोर पकडण्यासाठी वापर' केला जातो असा दावा पवार यांनी केल्याचं या व्हिडिओत दिसून येतं. खरातच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमातील हा व्हिडिओ असल्याची माहिती आहे. त्यामध्ये, व्यासपीठावर रुपाली चाकणकर यांचीही उपस्थिती पाहायला मिळते. अशोक खरात यांच्याकडे असलेल्या ओशनोलॉजीचा परदेशात चोर पकडण्यासाठी वापर केला जातो. पण, आपल्याकडे त्याला अंधश्रद्धा म्हणतात, असे वक्तव्य पोपटराव पवार यांनी केल्याचं दिसून येत आहे.

दरम्यान, यावर स्पष्टीकरण देताना पोपटराव पवार यांनी म्हटले आहे की, हा व्हिडिओ ३ वर्षांपूर्वीचा आहे. त्या परिसरातील लोकांनी आग्रह करुन मला तिथं बोलावलं होतं. जेव्हा कार्यक्रम झाला तेव्हा अनेकजण तिथं बोलले. एखाद्या कार्यक्रमात व्यक्तीचं चारित्र्य आपल्याला माहिती नसतं, त्यामुळे त्याप्रसंगी कुठलाही माणूस कितीही नालायक असला तरी आपण त्या व्यक्तीचं कौतुकच करतो. तिथं ओशनालॉजी हा विषय चर्चेत आलेला होता, मलाही हा विषय माहिती नव्हता. पण, तिथे ■ पान ४ वर

## पैठणमध्ये वैद्यकीय निष्काळजीपणाचा आरोप; शस्त्रक्रियेनंतर महिलेची दृष्टी गेल्याचा दावा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शहरातील संत एकनाथ सहकारी मल्टीस्पेशालिटी रुग्णालयात उपचारादरम्यान वैद्यकीय निष्काळजीपणा झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. शस्त्रक्रियेनंतर पत्नीची दृष्टी गेल्याचा दावा करत पतीने पोलिसांकडे धाव घेतली असून संबंधित डॉक्टरांवर कारवाईची मागणी केली आहे.

याबाबत विनोदकुमार भारद्वाज यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, पैठण यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. भारद्वाज हे गेल्या २२ वर्षांपासून पैठण येथे वास्तव्यास असून पेंटिंगचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात.

तक्रारीनुसार, त्यांच्या पत्नी ममता यांना ओटीपोटात त्रास होत असल्याने सुरुवातीला स्थानिक डायग्नोस्टिक सेंटरमध्ये तपासणी करण्यात आली. त्यानंतर त्यांना संत एकनाथ सहकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान दोन दिवस रक्त देण्यात आल्यानंतर २२ फेब्रुवारी २०२६ रोजी गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र, शस्त्रक्रियेनंतर रुग्ण शुद्धीवर आल्यानंतर तिची दोन्ही डोळ्यांची दृष्टी गेल्याचे आढळून आल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. ही बाब लक्षात येताच संबंधित डॉक्टरांनी रुग्णाला प्रथम दुसऱ्या रुग्णालयात व नंतर तातडीने औरंगाबाद येथे हलविण्याचा सल्ला दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, ■ पान ४ वर

## महाराष्ट्राचे अध:पतन झाल्याची भीती वाटते

### अशोक खरात प्रकरणावरून राज ठाकरेंचे मत

**मुंबई । वृत्तसंस्था –** अंधश्रद्धेच्या नावाखाली महिलांचे शोषण करणाऱ्या अशोक खरात प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यावरून सत्ताधारी आणि राजकीय व्यवस्थेवर कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत. ''ज्या महाराष्ट्राला संतांची आणि विचारांची थोर परंपरा आहे, तिथे खरातसारखा



नीच माणूस राजकारण्यांच्या आशीर्वादाने धुमाकूळ घालतो, हे पाहून महाराष्ट्राचे अध:पतन झाल्याची भीती वाटते,'' अशा भावना राज ठाकरे यांनी व्यक्त केल्या आहेत. ■ पान ४ वर

## युद्धाचा शेअर बाजाराला फटका

### गुंतवणूकदारांचे चौदा लाख कोटी बुडाले

**मुंबई । वृत्तसंस्था –** भारतीय शेअर बाजारात पुन्हा घसरण सुरु झाली आहे. सेन्सेक्स आणि निफ्टी ५० मध्ये २ टक्क्यांची घसरण झाली आहे. सेन्सेक्स १८३७ अंकांनी कमी होत किंवा २.४६ टक्के घसरण होऊन ७२६९६ अंकांवर पोहोचला आहे. निफ्टी ५० निर्देशांक ६०२ अंकांची घसरण होऊन २२५१२ अंकांवर बंद झाला. बीएसई १५० मिडकॅप आणि बीएसई २५० स्मॉलकॅप निर्देशांकात ४ टक्क्यांची घसरण झाली आहे.

शेअर बाजारात सुरु असलेल्या घसरणीमुळं बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य घसरलं. बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य शुक्रवारी ४२९ लाख कोटी रुपयांवर होतं. त्यात १४ लाख कोटी रुपयांची घसरण झाली आहे. आज बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४१५ लाख कोटींवर आलं आहे.

शुक्रवारी शेअर बाजारात थोडी तेजी दिसून आली होती. मात्र, आठवड्याच्या पहिल्याच दिवशी शेअर बाजार पुन्हा कोसळला. या घसरणीमागे अमेरिका आणि इराण यांच्यात सुरु असलेल्या युद्धाची वाढलेली तीव्रता हे आहे. अमेरिकेनं इराणला होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यास ४८ तासांची मुदत दिलेली आहे. तर, इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी फक्त दुश्मन देशांसाठी बंद असल्याचं म्हटलंय.

भारतीय रुपयाचं होणारं अवमूल्यन हे देखील शेअर बाजारातील घसरणीला कारणीभूत आहे. भारतीय रुपया २६ पैशांनी कमजोर होत डॉलरच्या तुलनेत ९३.९७ रुपयांवर पोहोचला.

अमेरिका आणि ■ पान ४ वर

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी बालयोगी उमेशनाथ महाराज यांची भेट

### । वाल्मीकि मंदिर, विमानतळ व सफाई मित्रांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा
### । अहिल्यानगर शहर भाजप जिल्हा उपाध्यक्ष नरेश चव्हाण यांची माहिती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नवी दिल्ली येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उज्जैन येथील श्री क्षेत्र वाल्मीकि धामचे पीठाधीश्वर, परमपूज्य राष्ट्रीय संत बालयोगी उमेश नाथजी महाराज तथा राज्यसभा सदस्य यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत सामाजिक, धार्मिक तसेच सार्वजनिक हिताच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



या प्रसंगी अयोध्येतील राम जन्मभूमी मंदिर परिसरात भगवान महर्षी वाल्मीकि यांचे मंदिर उभारण्याची मागणी करण्यात आली. तसेच आंतरराष्ट्रीय महर्षी वाल्मीकि विमानतळ स्थापन करण्याबाबतही पाठपुरावा करण्यात आला. पंजाबमधील आदमपूर विमानतळाचे नामांतर संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या नावाने करण्यात आल्याबद्दल पंतप्रधानांचे आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी वाल्मीकि समाजातील सफाई मित्रांच्या कल्याणाशी संबंधित विविध प्रश्नांवरही चर्चा झाली. वर्गीकरणाशी ■ पान ४ वर

## सहजयोगाचे कार्य हे समाजाला दिशा देणार - उपमहापौर धनंजय जाधव

### प. पु. माताजींचा १०३ वा वाढदिवस अहिल्यानगरमध्ये संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प. पु. माताजी निर्मला देवी यांचा १०३ वा वाढदिवस सहजयोग चारिटेबल ट्रस्ट व सहजयोग परिवाराच्या वतीने अहिल्यानगर येथील सहज भुवन आश्रम मध्ये संम्पन्न झाले या वेळी वाढदिवसाचे औचित्य साधून अहिल्यानगर महानगरपालिकेचे महापौर व उपमहापौर यांचा सन्मान सहजयोग परिवारातील जेष्ठ सहजयोगी लक्ष्मण अंदे, उत्तम बेरड, विनायक जोग, मेजर पोतदार व बोटकर काका यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी बोलतांना उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले सहजयोग ध्यान साधने बाबत मला लहानपणा पासून माहिती आहे परंतु हा सहजयोग जगातील १४० देशापेक्षा जास्त देशा मध्ये आहे याची माहिती नव्हती. सहजयोगा मुळे समाजातील अनेक घटकांना याचा फायदा होतो व या योगामुळे समाज परिवर्तन होऊ शकते. सहजयोगाचे कार्य हे समाजाला दिशा देणारे



असल्यामुळे याचा लाभ जास्तीत जास्त घटकांनी घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. जिल्हा समन्वयक श्रीनिवास बोज्जा यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश सूर्यवंशी यांनी मानले तर आभार अमित बुरा यांनी केले. कार्यक्रमांस अहिल्यानगर शहरसह जिल्ह्यातील सहजयोगी मोठया प्रमाणात उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीकरणे साठी सहजयोगी रवींद्र आगरकर, गणेश कोडम, संदीप गांगर्डे, शुभम भालदंड, अशोक कराळे, गजेंद्र सांगळे, धनंजय ढाकणे, कार्तिक ढाकणे, मनोहर म्याना, मनोहर अंकम आदींनी परिश्रम घेतले.

## पैठण - शेवगाव रोडवर भीषण अपघात

### पेट्रोल टाकीचा स्फोट एक ठार, ६ वर्षीय बालक गंभीर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण-शेवगाव रोडवरील पाटेगाव परिसरात सोमवारी सायंकाळच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर भीषण धडक होऊन मोठा अपघात घडला. या धडकेत एका दुचाकीची पेट्रोल टाकी फुटून स्फोट झाल्याने घटनास्थळीच एकाचा मृत्यू झाला, तर सहा वर्षीय बालक गंभीररीत्या भाजल्याची धक्कादायक घटना घडली आहे.



प्राथमिक माहितीनुसार, दोन्ही दुचाकी वेगात असल्याने धडक इतकी जोरदार होती की अपघातानंतर लगेचच पेट्रोल गळती होऊन टाकीचा स्फोट झाला. स्फोटामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. आगीत अडकलेल्या प्रवाशांपैकी एकाचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, या अपघातात सहा वर्षीय बालक गंभीररीत्या भाजले असून त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले आहे. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर येत आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून मृत व जखमींची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## शेती, पशुपालन आणि पक्षी संगोपनाचा अनोखा मेळा - आ. काशिनाथ दाते सर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** जिल्हा परिषद अहिल्यानगर व पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती पारनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय पशुपक्षी प्रदर्शन २०२६ हे आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडले. विविध प्रकारच्या पशुधनाचे आकर्षक प्रदर्शन, गुणवंत पशुपालकांचा सन्मान आणि बक्षीस वितरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

यावेळी बोलताना आमदार दाते यांनी पशुपालकांच्या कष्टांचे कौतुक करत सांगितले की, ''तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून शेतकऱ्यांनी जीवापाड जपलेली जनावरे येथे आणली आहेत. ही केवळ जनावरे नसून त्यांच्या कष्टाचे, जिव्हाळ्याचे आणि प्रेमाचे प्रतीक आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शेतकरी जनावरांचे संगोपन करत आहे, हे कौतुकास्पद आहे.''

''मांजर, शेळी, कोंबडीपासून ते गाय, म्हैस, बैल आणि घोड्यांपर्यंत विविध पशुधन या ■ पान ४ वर



**कार्यक्रम पत्रिकेत पहिले तर अनेक विभागाची नावे आहेत पण ते आज उपस्थित राहिले नाहीत. शासनाच्या कार्यक्रमाला शासकीय कर्मचाऱ्यानी अशा पद्धतीने गैरहजर राहणे योग्य नाही. शिवाय अधिवेशन चालू आहे, अधिवेशन काळात कुठल्याही अधिकाऱ्याने मुख्यालय न सोडण्याचे स्पष्ट निर्देश असतानाही आज अनेक विभागाचे अधिकारी उपस्थित नाहीत. आपला हा मेसेज त्या सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांपर्यंत जाईल व उद्याच्या काळात ते सर्वजण शासनाच्या कुठल्याही विभागाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहतील असा मला विश्वास वाटतो.**

**-आमदार काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

## दै. आकर्षण निवडक

### १० वर्षीय सुलतान जहागीरदारचे महिनाभर उपवास पूर्ण



अहिल्यानगर - पवित्र रमजान महिन्याच्या आध्यात्मिक वातावरणात केवळ १० वर्षांच्या सुलतान शोहेब जहागीरदार या चिमुकल्याने पूर्ण ३० रोजे (उपवास) यशस्वीरीत्या पूर्ण करत एक प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे. एवढ्या लहान वयात दाखविलेली चिकाटी, श्रद्धा आणि संयम यामुळे बेलदार गल्ली व तेलीखूंट परिसरात त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. रमजान हा केवळ उपवासाचा नव्हे, तर आत्मशुद्धी, संयम, त्याग आणि मानवतेचा संदेश देणारा महिना मानला जातो. सुलतानने दिवसभर उपाशी राहूनही नमाज अदा करणे, कुरआन पठण आणि इतर धार्मिक कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडत या मूल्यांचे पालन केले. त्याच्या या प्रयत्नांमुळे केवळ कुटुंबीयच नव्हे, तर परिसरातील नागरिकही भावूक झाले आहेत. सुलतानच्या या यशामागे त्याच्या कुटुंबीयांचा मोठा आधार असून तो सामाजिक कार्यकर्ते साहेबानं जहागीरदार यांचा भाचा आणि पप्पू जहागीरदार यांचा नातू आहे. जहागीरदार परिवाराकडून मिळालेले योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि धार्मिक संस्कार यामुळेच सुलतानने हे कठीण वाटणारे उद्दिष्ट सहज पूर्ण केले. दरम्यान, ''लहान वयातच मुलांमध्ये चांगले संस्कार रुजले, तर ते पुढे समाजाचे आदर्श नागरिक बनतात,'' असे मत अनेकांनी व्यक्त केले. विविध धर्म व समाजातील लोकांनी सुलतानचे अभिनंदन करून त्याला शुभेच्छा दिल्या. त्यामुळे रमजानच्या पवित्र महिन्यात सामाजिक सलोखा, प्रेम आणि एकात्मतेचा संदेशही अधोरेखित झाला आहे. सुलतान शोहेब जहागीरदारचा हा प्रेरणादायी प्रवास इतर मुलांसाठीही निश्चितच आदर्श ठरणारा आहे.

### निमगाव वाघा येथे रमजान ईद उत्साहात साजरी



अहिल्यानगर - नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे रमजान ईद मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली. गावातील मशिदीत मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज अदा करून गावाच्या सुख-समृद्धी, शांतता आणि प्रगतीसाठी प्रार्थना केली. या धार्मिक सोहळ्यानंतर हिंदू बांधवांनी मशिदीत उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. एकमेकांना आलिंगन देत सण साजरा करण्यात आला आणि गावातील हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडले. मौलाना हाफिज अनजर यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज पठण करण्यात आले. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, चाँद शेख, प्राचार्य आदम शेख, साहेबराव बोडखे, सलीम शेख, गुड्डू शेख, दिलावर शेख, बाबुराव जाधव, ह.भ.प. एकनाथ महाराज धायतडक, हुसेन शेख, गुलाब शेख, उस्मान शेख, इस्माईल शेख, जालिंदर आतकर, आसिफ शेख, सादिक शेख, आबिद शेख, बख्तार सय्यद, बन्सी शेख, जावेद शेख, मुन्ना पठाण, शाहरुख शेख, बाबुभाई शेख, फिरोज शेख, मयूर काळे, संदीप डोंगरे, हबीब शेख आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या. गावकऱ्यांच्या वतीने पै. नाना डोंगरे यांनी मौलाना हाफिज अनजर यांचा सत्कार करून त्यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. तसेच मुस्लिम बांधवांना गुलाबपुष्प देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.

### गॅस तुटवड्याचा प्रश्न सोडविण्यासाठी

# केंद्र आणि राज्य सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे - पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** औद्योगिक क्षेत्रासमोर निर्माण झालेल्या गॅस तुटवड्याचा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी, औद्यगिक विकास महामंडळाचे क्षेत्रीय यांनी एकत्रितपणे गॅस वितरणातील त्रृटी दूर करण्यासाठी पुढकार घेण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

अहिल्यानगर तसेच जिल्ह्यातील अन्य औद्योगिक वसाहती मध्ये गॅस टंचाईमुळे निर्माण झालेल्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत औद्योगिक वसाहतीच्या कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.महापौर ज्योती गाडे जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया औद्यगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड,जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती हेमा बडे स्थायी समितीचे अध्यक्ष सुभाष लोंढे भाजपाच्या उद्योग आघाडीचे अनंत देसाई आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खताळ बीपीसीएलचे मार्केटींग ऑफीसर मनोज जाधव,एलपीजीचे समन्वय अधिकारी सूर्यवंशी एचपीसीएलचे ब्रजेशकुमार यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत औद्यगिक क्षेत्राकरीता आवश्यक असलेल्या गॅस पुरवठ्याचा आढावा घेतला.याबाबत उद्योजकांनी आपल्या समस्यांची माहीती मंत्र्यासमोर मांडली.जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांनी केंद्र व राज्य सरकारकडून आलेल्या नव्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे शैक्षणिक संस्था वसतिगृह औद्योगिक वसाहती मधील कॅन्टीन,यांना वितरीत करण्यात येणार्या गॅसची माहीती सादर केली.

बैठकीत उपस्थित असलेल्या उद्योकांनी मांडलेल्या समस्यामध्ये प्रामुख्याने पीएनजी वाहीन्यांच्या जोडण्या होत नसल्याचे निदर्शानास आणून दिले.याबाबत मार्केटींग ऑफीसर मनोज जाधव यांनी बाराशे ते तेराशे कनेक्शन आतापर्यत जोडले असल्याची माहीती दिली. सर्व उद्योजक कनेक्शन घेण्यास तयार असले तरी कंपनीकडे असलेल्या अपुर्या यंत्रणेमुळे कनेक्शन जोडण्यात अडचणी असल्याचे निदर्शानास येताच मंत्री विखे यांनी सर्व कंपन्याचे करारनामे पूर्ण करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून द्याने मराठा चेंबर्सच्या किंवा औद्योगिक वसाहतीच्या कार्यालयता स्वतंत्र यंत्रणा सुरू करण्याच्या सूचना दिल्या.ज्या कंपन्यांना कनेक्शन दिले त्यांना तातडीने गॅस पुरवठा सुरू करण्याचे तसेच कंपन्याचे सहकार्य चेवून जोडण्याचे काम पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले.

कंपन्यांशी झालेल्या कराराप्रमाणे वितरीकांच्या जोडण्या पूर्ण कशा होतील यासाठी जिल्हाधिकार्यांनी स्वता कंपन्याचे प्रतिनिधी उद्योजक यांचा समन्वय साधून या कामातील त्रृटी तातडीने दूर करण्यासाठी पुढाकार घेण्याचे सुचित करून शहरातही चाळीस हजार घरगुती जोडण्या झालेल्या आहेत.मात्र महापालिकेने वाढविलेल्या दरामुळे काम थांबल्याचे सांगण्यात आले.मात्र महापालिकेने याबाबत योग्य मार्ग काढावा आशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी महपौर ज्योती गाडे आणि स्थायी समितीचे अध्यक्ष सुभाष लोंढे यांना दिल्या. जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या परीस्थितीमुळे निर्माण झालेल्या आव्हनात्मक परीस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या उपाय योजनामुळे देश खंबीरपणे उभा आहे.



### अहिल्यानगरचे उपमहापौर धनंजय जाधव यांनी घेतले तुळजाभवानी मातेचे दर्शन

**तुळजापूर:** अहिल्यानगरचे उपमहापौर श्री. धनंजय कृष्णा जाधव यांनी नुकतीच कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या चरणी हजेरी लावली. जाधव यांनी सहकुटुंब मंदिरात जाऊन देवीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी देवीची विधिवत पूजा करून नगरकरांच्या सुख–समृद्धीसाठी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली. ''आई राजा उदो उदो'' च्या जयघोषात त्यांनी दर्शन पूर्ण केले. यावेळी मंदिराचे पुजारी श्री विश्वजीत कदम पाटील यांनी त्यांचा यथोचित सत्कारही केला.

### 'महाआरोग्य शिबीर' आणि 'आयुष्मान कार्ड' नोंदणीचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्व. अरुणकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगरमध्ये भव्य महाआरोग्य शिबीर आणि आयुष्मान कार्ड निर्मिती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. श्री साईद्वारका सेवा ट्रस्ट, अहिल्यानगर महानगरपालिका, आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजना यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर संपन्न होणार आहे. वेळ आणि ठिकाण: हे शिबीर बुधवार, दिनांक २५ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत पोलीस लॉन्स, न्यू आर्ट्स कॉलेजसमोर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आले आहे. शिबिरातील प्रमुख सोयी–सुविधा: या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून विविध आजारांवर मोफत तपासणी व सल्ला दिला जाईल. यामध्ये प्रामुख्याने: नेत्ररोग, अस्थिरोग, मेंदूरोग आणि हृदयरोग तपासणी. कर्करोग, मूत्ररोग, जनरल मेडिसिन आणि जनरल सर्जरी. स्त्रीरोग, बालरोग, श्वसनविकार व क्षयरोग. त्वचा व गुप्तरोग तपासणी. मोफत ईसीजी आणि मोफत रक्त तपासणी.यासोबतच शासनाच्या आयुष्मान भारत योजनेचे कार्ड देखील घटनास्थळी काढून दिले जाणार आहे. यासाठी नागरिकांनी येताना आपले आधार कार्ड (मोबाईल नंबर लिंक असलेले) आणि रेशन कार्डची झेरॉक्स सोबत आणणे आवश्यक आहे. आयोजक व संपर्क: उपमहापौर ॲड. धनंजय कृष्णा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर होत असून, नागरिकांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. नावनोंदणीसाठी राहुल मुथा (९५४५५६७०८८), रुपेश येनगुपटला (८३८००७६९७७), अक्षय संभार (८८३०९१९१९८) किंवा बालाजी कोंडा (९०११६७७८९१) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### अवैध दारू अड्ड्यावर तरुणाचा मृत्यू; प्रशासनाचा ढिसाळ कारभार उघड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील ढोकेफळ येथे अवैध दारू विक्रीच्या अड्ड्यावर एका तरुणाचा संशयास्पद मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. रविवारी (दि.२२) ही घटना उघडकीस आली असून, यामुळे प्रशासनाच्या निष्क्रियतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ७४ जळगाव फाट्याजवळ सुरू असलेल्या गावठी दारू विक्रीच्या अड्ड्यावर विष्णू बबन मोरे (वय २५) हा तरुण बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. स्थानिकांनी तातडीने त्याला रुग्णालयात हलविले; मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणात अतिदारू सेवनामुळे मृत्यू झाला की अन्य काही संशयास्पद कारण आहे, याबाबत अद्याप स्पष्टता नसून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस व दारूबंदी विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, ग्रामपंचायतीने काही दिवसांपूर्वी दारूबंदीचा ठराव केल्याचा दावा केला जात असताना प्रत्यक्षात अवैध दारू विक्री खुलेआम सुरू असल्याचे वास्तव या घटनेतून समोर आले आहे. त्यामुळे प्रशासनाचा कारभार केवळ कागदोपत्रीच असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. या घटनेनंतर परिसरात संताप व्यक्त होत असून, अवैध दारू विक्री बंद करण्यासाठी तातडीने कठोर कारवाई करावी, अन्यथा अशा घटना पुन्हा घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### माशा कला केंद्रांतील डीजे संस्कृतीविरोधात कलाकार संघटनेचा आवाज बुलंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अखिल महाराष्ट्र लोकनाट्य सांस्कृतिक कलाकार संघटनेच्या वतीने जिल्ह्यातील तमाशा कला केंद्रांमध्ये सुरू असलेल्या डीजे व आधुनिक साऊंड सिस्टिमच्या वापराविरोधात जोरदार भूमिका घेत जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन सादर करण्यात आले. पारंपरिक तमाशा कलेचे अस्तित्व धोक्यात येत असल्याचा गंभीर मुद्दा यावेळी मांडण्यात आला.

संघटनेने शासनाच्या दि. २५ मार्च २०२५ च्या आदेशाचा संदर्भ देत सांगितले की, राज्यातील तमाशा कला केंद्रांमध्ये बेकायदेशीररित्या डीजे व साऊंड सिस्टिमचा वापर सुरू असून यावर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार महसूल व पोलीस प्रशासनाने काही ठिकाणी कारवाई केली असली, तरी पुन्हा त्याच पद्धतीने डीजे सुरू होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

जामखेडसह जिल्ह्यातील अनेक कला केंद्रांना शासनाकडून परवाने देण्यात आले असले, तरी ते अटींचे पालन न करता चालविले जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. काही ठिकाणी फक्त एक–दोन नर्तिकांवर आधारित कार्यक्रम ठेवून डीजेच्या माध्यमातून बेकायदेशीर प्रकार सुरू असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारामुळे पारंपरिक तमाशा कलेतील गायिका, नृतिका, पेटी मास्तर, तबलावादक, सोंगाड्या अशा मूळ कलाकारांवर उपासमारीची वेळ आली आहे. अनेक कलाकारांना सध्या कोणत्याही कला केंद्रात काम मिळत नसल्याने त्यांचे जीवन संकटात सापडले आहे.

### मुलीच्या आग्रहास्तव डॉ. सुजय विखे पाटलांनी चीन व दुबईमधील प्रसिद्ध आइस्क्रीम थेट शिर्डीतच बनवली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी –**शिर्डीतील आइस्क्रीम व्यवसायात उत्तुंग भरारी घेत शिर्डी, महाराष्ट्रच नव्हे तर थेट परराज्यात देखील क्लासिक आइस्क्रीमच्या माध्यमातून शिर्डीचा नावलौकिक वाढविणाऱ्या हाजी बाबाभाई सय्यद,हाजी युनूस भाई शहा या शिर्डीतील दोघा मित्रांनी २००० साली छोट्याशा पत्र्याच्या शेड मधे सुरू केलेला छोटेखानी आइस्क्रीमचा व्यवसाय आज आपली मुले अजहर बाबाभाई सय्यद,मोसीन युनूस शाह यांच्या साथीने आज कोट्यावधींची उलाढाल व भव्य चार मजली इमारतीत दिमाखात उभा असलेला कारखाना सय्यद व शाह परिवाराच्या प्रामाणिक मेहनतीची साक्ष देत अनेकांना प्रेरणा देणारा ठरतोय.



आज डॉ सुजय विखे पाटील यांच्या हस्ते क्लासिक आइस्क्रीमच्या नवीन मँगो कँडी या उत्पादनाचा शुभारंभ करण्यात आला. विशेष म्हणजे हुबेहूब आंब्याच्या आकाराची असलेली नवीन मँगो कँडी ही चक्क डॉ सुजय विखे पाटील यांनी खास बाबाभाईना आग्रह करून बनवायला लावली असल्याचे खुद्द डॉ सुजय विखे पाटील यांनी सांगितले तर आपल्या मनोगतात याबाबतचा किस्सा देखील सांगितला...दुबईतील कतार येथे मुलीला घेऊन गेले असता इंस्टाग्राम वर चीन मध्ये बनलेली आंब्याच्या आकाराची आइस्क्रीम कँडी मोठी व्हायरल होत असल्याने सुजय दादांच्या मुलीने तीच आइस्क्रीम हवी असा हट्ट धरला असता डॉ सुजय विखे पाटील यांनी शोध शोध शोधून ती मँगो कँडी मुलीला मिळवून तर दिली मात्र आपल्या तालुक्यात सुद्धा ही मँगो कँडी तयार झाली पाहिजे असा विचार मनी आला अन् क्लासिक आइस्क्रीमचे बाबाभाई सय्यद यांना याबाबत सांगितले असता त्यांनी आज अखेर हुबेहूब जशीच्या तशी मँगो कँडी बनवत आज डॉ सुजय विखे पाटलांच्या हस्ते त्याचा शुभारंभ केला.

यावेळी डॉ सुजय विखे पाटील यांनी सांगितले की जेव्हा केंद्र सरकारच्या अन्न प्रक्रिया मंत्रालयाच्या माध्यमातून बाबाभाई यांनी भव्य कोट्यावधींची इमारत उभी केली तेव्हा मी उद्घाटनासाठी आलो नाही मात्र आज पाच दहा रुपयांच्या मँगो कँडी चा शुभारंभ करतांना मनाला मोठे समाधान लाभत असून शिर्डी व परिसरातील युवकांनी अशा वेगवेगळ्या व्यवसायांमध्ये पुढाकार घेत उद्योग व्यवसाय वाढवावे विखे पाटील परिवार नेहमी तुमच्या पाठीशी खंबीर उभा राहील.

यावेळी प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते, राहता कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर आबा गोंदकर,उपनगराध्यक्ष अभय भैय्या शेळके,साई संस्थान सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार, राहता नगरपरिषदेचे गटनेते मुन्नाभाई शाह यांसह शिर्डी नगरपरिषदेचे सर्व नगरसेवक ग्रामस्थ आणि मुस्लिम बांधवांची उपस्थिती होती

### अभिमान स्त्री शक्तीचा, उत्सव नगरच्या संस्कृतीचा; चैत्र शोभायात्रेत नगरकरांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** 'अभिमान स्त्री शक्तीचा, उत्सव नगरच्या संस्कृतीचा' या घोषवाक्याने प्रेरित होत अहिल्यानगर शहरात पार पडलेल्या चैत्र शोभायात्रेला नागरिकांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. प्रोफेसर कॉलनी चौक ते पारिजात चौक या मार्गावर निघालेल्या या भव्य शोभायात्रेत विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि पारंपरिक पैलूंचे दर्शन घडले. आकर्षक चित्ररथ, विविध वेशभूषा केलेले सहभागी, घोडेस्वारांची दिमाखदार उपस्थिती, ढोल–ताशांचा गजर, लेझीम आणि लाठी–काठीचे प्रात्यक्षिक यामुळे संपूर्ण परिसर उत्साहाने दुमदुमून गेला होता.

रेडिओ सिटी तर्फे आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी सकाळपासूनच नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. शोभायात्रेची सुरुवात नांदी, गणेशवंदना, राधा–कृष्ण आरती आणि 'शिवगर्जना'च्या निनादात झाली. पारंपरिकतेसोबतच आधुनिकतेचा संगम साधणार्या या यात्रेत सहभागी झालेल्या विविध मंडळांनी आपल्या सादरीकरणातून समाजप्रबोधनाचे संदेश दिले.

सांगता सोहळ्यात व्हिक्टर डान्स अकॅडमीचे आकर्षक नृत्य सादरीकरण, होमिओपॅथिक कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे



प्रभावी प्रयोग तसेच एमएमवायटीसी () च्या योगा प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली. यंदाची मध्यवर्ती संकल्पना 'स्त्री शक्तीचा अभिमान' असल्यामुळे अनेक गटांनी महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारे सादरीकरण केले, ज्यामुळे शोभायात्रेला विशेष अर्थ प्राप्त झाला.

या कार्यक्रमाला शहरातील मान्यवरांचीही उपस्थिती लाभली. महापौर ज्योती गाडे, डॉ. के. बालराजू, जिल्हा रोग्याधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, बाबासाहेब वाकळे, नगरसेवक ॲड. ऋग्वेद गंधे, रविंद्रजी मुळे, पुष्कर कुलकर्णी आदी मान्यवरांनी सहभाग घेतला. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

शोभायात्रेत शहरातील विविध संस्था व संघटनांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. यामध्ये रोटरी क्लब, अरालिया लाईफस्टाईल, विचार भारती, मेहेरबाबा ग्रुप, आर्ट ऑफ लिव्हिंग, जय बजरंग विद्यालय, जिल्हा आरोग्य विभाग, गुरु माउली संगीत विद्यालय, बालरंगभूमी परिषद, एमएमवायटीसी, एम्प्रेस बायकर्स, चौपाटी कारंजा मित्र मंडळ, झुलेलाल ग्रुप, अनाम प्रेम, सीए असोसिएशन, लॉरीड्स नूडसन, त्रिपुरारी योगा ग्रुप, तिरंगा फाउंडेशन, आयएमए वुमेन्स डॉक्टर विंग, इस्कॉन, राजमुद्रा ग्रुप, अनाहत, जय जिजाऊ लेझीम पथक, ज्ञानप्रबोधिनी हॉस्टेल ग्रुप, फायर ब्रिगेड, स्नेहालय, अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशन, होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, राजस्व हॉर्स, शार्प मल्टिमीडिया आदींचा समावेश होता.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### मुंबईत १३ एप्रिलला जिजाऊ ब्रिगेडचे राज्यस्तरीय महाअधिवेशन

अहिल्यानगर- सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक विचारपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने दिनांक १३ एप्रिल रोजी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर येथे राज्यस्तरीय महाअधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. या अधिवेशनास अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष नंदिनीताई सोनाळे यांनी केले आहे. या पार्श्वभूमीवर नुकतीच ऑनलाईन बैठक पार पडली असून, कार्याध्यक्ष योगिताताई कर्डिले यांच्यासह कार्यकारिणीतील सर्व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. अधिवेशनाच्या नियोजनासंदर्भात विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या महाअधिवेशनात महाराष्ट्रासह देशभरातून सुमारे १००० महिला पदाधिकारी सहभागी होणार असून, प्रत्येक जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्त्यांची उपस्थिती अपेक्षित आहे. चार सत्रांमध्ये पार पडणाऱ्या या अधिवेशनाचे उद्घाटन मुंबई महानगरपालिकेच्या महापौर रितू तावडे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सीमाताई बोके उपस्थित राहणार असून, विविध सुप्रसिद्ध वक्त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच अधिवेशनस्थळी जिजाऊ ब्रिगेडच्या स्मरणिकेचे प्रकाशनही करण्यात येणार आहे. या अधिवेशनासाठी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम खेडेकर, शिवधर्म संसद सदस्य रेखाताई खेडेकर, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे, राज्य कार्याध्यक्ष नवनाथ घाडगे, प्रदेश महासचिव चंद्रशेखर शिखरे, जिजाऊ ब्रिगेडच्या महासचिव स्नेहाताई खेडेकर, आंतरराष्ट्रीय अध्यक्ष मयुराताई देशमुख तसेच राष्ट्रीय अध्यक्ष निर्मलाताई पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य उपाध्यक्ष अंजलीताई भोसले, मुंबई अध्यक्ष स्मिता देसाई, नवी मुंबई अध्यक्ष भारतीताई पाटील, महासचिव सरिताताई सोमवंशी, अध्यक्ष मनीषाताई देसाई, ठाणे जिल्हाध्यक्ष सुनीताताई पाटील तसेच मुंबईतील पदाधिकारी विशेष परिश्रम घेत आहेत.या अधिवेशनातील वैचारिक प्रबोधन आणि सांस्कृतिक उपक्रमांचा लाभ घेण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नंदिनीताई सोनाळे यांनी केले आहे.

### बोल्हेगाव येथील मदिना मस्जिदमध्ये रमजान ईदची नमाज अदा



अहिल्यानगर- बोल्हेगाव उपनगरातील गांधीनगर येथील मदिना मस्जिदमध्ये रमजान ईदची विशेष नमाज अदा करण्यात आली. यावेळी भारताच्या प्रगतीसाठी तसेच देशात अमन व शांतता नांदावी यासाठी प्रार्थना करण्यात आली. रमजान महिना हा प्रेम, बंधुभाव आणि एकतेचा संदेश देणारा पवित्र महिना आहे. या महिन्यात मुस्लिम समाज महिनाभर रोजे (उपवास) ठेवून शेवटच्या दिवशी ईद-उल-फित्र, म्हणजेच रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करतो. ईद-उल-फित्रच्या दिवशी गांधीनगरच्या मस्जिदमध्ये नमाज अदा करून देशाच्या प्रगतीसाठी, तसेच देशात शांतता आणि सौहार्द टिकून राहावे यासाठी अल्लाहकडे विशेष दुआ करण्यात आली. या नमाजमध्ये परिसरातील हजारो मुस्लिम बांधव सहभागी झाले होते. या प्रसंगी नगर जिल्ह्यात जातीभेद विसरून सर्व समाजाने एकोप्याने राहावे, यासाठी देखील प्रार्थना करण्यात आली. नमाजनंतर उपस्थितांनी एकमेकांना ''ईद मुबारक''च्या शुभेच्छा देत बंधुभाव आणि ऐक्याचा संदेश दिला. ईदच्या निमित्ताने गरीब व गरजू नागरिकांना मदत करण्याचेही आवाहन करण्यात आले. तसेच या दिवशी घरोघरी पारंपरिक शीरखुरमा आणि खाद्यपदार्थ तयार करून आनंद साजरा करण्यात आला. यावेळी मौलाना इर्शाद रझवी आलम यांनी सामुदायिक नमाज पठण करुन एकात्मतेचा संदेश दिला. तसेच मदिना मस्जिदचे अध्यक्ष नुरमहंमद शेख, चांद शेख, रज्जाक शेख, महेबूब शेख, लतीफ बेग, अजीजखा पठाण, जब्बार शेख, रिजवान शेख तसेच मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निंबळक गटातील हजारो महिलांनी घेतले तुळजाभवानी मातेचे दर्शन

**भक्तीमय वातावरणात मराठी नववर्षाचा प्रारंभ | तीन दिवस दर्शनासाठी धावल्या ४० लक्झरी बसेस**



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** मराठी नववर्ष गुढी पाडव्याच्या पार्श्वभूमीवर निंबळक गटातील हजारो महिलांना तुळजाभवानी मातेचे दर्शन घडविण्यात आले. माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे यांच्या माध्यमातून कुलस्वामिनी तुळजाभवानी (तुळजापूर) यात्रेचा हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

तीन दिवस चाललेल्या या यात्रेत तब्बल तीन ते चार हजार महिला भाविकांनी सहभाग नोंदविला. निंबळक गटातील १८ गावांतील महिलांनी या यात्रेत उत्साहाने सहभाग घेतला. या उपक्रमासाठी दररोज ४० लक्झरी बसची व्यवस्था करण्यात आली होती, ज्यामुळे महिलांना सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवासाचा अनुभव मिळाला.

रविवारी (दि.२२ मार्च) यात्रेच्या शेवटच्या टप्प्यात नेप्ती, हमीदपूर, हिंगणगाव, जखनगाव, टाकळी, खातगाव, निंबळक, इसळक आदी गावांतील महिला भाविकांना तुळजापूरकडे रवाना करण्यात आले. प्रवासादरम्यान महिलांसाठी नाश्त्याची तसेच तुळजापूर येथे देवदर्शनानंतर दुपारच्या भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी उद्योजक अजय लामखडे, केतन लामखडे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवाजी होळकर, नेप्तीचे माजी सरपंच संजय जपकर, निंबळकचे उपसरपंच बाबासाहेब कोतकर, चेअरमन भाऊराव गायकवाड ,व्हा. चेअरमन अविनाश आळंदीकर , रामदास फुले ,बाळासाहेब पगारे ,पोपट खामकर, बाळासाहेब कोतकर, भाऊसाहेब गायकवाड, बाबासाहेब पगारे, नानासाहेब पगारे, तुकाराम शेळके , बहिरु घोलप, दिपक चेडे, माजी सरपंच मिरा जपकर ,सविता चेडे, कमल चेडे, मंगलबाई गोडसे, संगीता घोलप, स्वाती घोलप, अनुसया गवळी, चंद्रकला गुलदगड आदी मान्यवर उपस्थित होते. या यात्रेला महिला वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, धार्मिक वातावरणात एकात्मता आणि श्रद्धेची अनुभूती सर्वांनी घेतली.

उद्योजक अजय लामखडे म्हणाले की, ''निंबळक गटातील माताभगिनींसाठी तुळजाभवानी मातेच्या दर्शनाची ही यात्रा आयोजित करताना आम्हाला अत्यंत समाधान वाटत आहे. आपल्या सर्वांची कुलस्वामिनी असलेल्या तुळजाभवानी मातेचे दर्शन प्रत्येक महिलेला सहज आणि सुरक्षितरीत्या घडावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. गुढी पाडवा हा आपल्या मराठी संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचा सण आहे. या पवित्र पर्वाच्या निमित्ताने महिलांना आध्यात्मिक आनंद मिळावा आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी, यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# विवाह जुळविताना अवाजवी अपेक्षा टाळून, सामंजस्याची भूमिका स्वीकारावी - भगवान फुलसौंदर

**अहिल्यानगरात राज्यस्तरीय माळी वधू–वर मेळावा उत्साहात**
**अनेकांचे संसार फुलविण्यासाठी सामाजिक संस्थांचा पुढाकार**

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** बदलत्या सामाजिक रचनेमुळे विवाह जुळविणे ही सर्व समाजासाठी मोठी गरज बनली असून, विभक्त कुटुंब पद्धती, नोकरी–व्यवसाय आणि सोशल नेटवर्किंगमुळे परस्पर भेटीगाठी कमी झाल्याने मुला–मुलींचे विवाह जुळविताना अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे पालकांनी अवाजवी अपेक्षा न ठेवता सामंजस्याची भूमिका स्वीकारावी, असे आवाहन माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी केले.

रयत प्रतिष्ठान, जय युवा अकॅडमी, जनवार्ता, क्रांती ज्योती बहुउद्देशीय संस्था, समृद्धी बहुउद्देशीय महिला संस्था, सावित्रीबाई फुले महिला संस्था, श्री संत सावता माळी युवक संघ तसेच जागृती बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय माळी वधू–वर मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली.

या वेळी ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे, शहर बँकेचे व्हाइस चेअरमन प्रा. माणिक विधाते, किशोर डागवाले, नगरसेविका आशाताई डागवाले, साहेबराव निधाने, दत्ता जाधव, मंगलताई भुजबळ, सारंग पंधाडे, मच्छिंद्र बनकर, प्रा. सिताराम जाधव, ॲड. महेश शिंदे, प्रा. अश्विनी जाधव, ॲड. पोपटराव बनकर, जयश्रीताई शिंदे, स्वाती बनकर, ॲड. दिनेश शिंदे, नितीन डागवाले, दर्शन बनकर, अनंत द्रविड, प्रा. संजय पडोळे, तुषार रणनवरे, रामेश्वर राऊत आदींसह समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी पुढे बोलताना भगवान फुलसौंदर म्हणाले की, बदलत्या काळानुसार केवळ सरकारी नोकरी करणारा वधू–वर मिळावा या अपेक्षेवर ठाम राहणे योग्य नाही. अनेक तरुण–तरुणी उद्योग–व्यवसायात पुढे जात आहेत. त्यामुळे त्यांच्या स्वभाव, निर्व्यसनी जीवनशैली आणि कुटुंब पार्श्वभूमीचा विचार करून विवाह जुळविणे आवश्यक आहे. लग्न करताना अहंकार बाजूला ठेवून तडजोडीची भूमिका घेणे काळाची गरज बनली आहे. शिक्षण आणि करिअरमुळे विवाहाचे वय वाढत असून, योग्य वेळी विवाह होणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात ॲड. महेश शिंदे यांनी सांगितले की, समाजाची गरज ओळखून मागील काही वर्षांपासून हा वधू–वर मेळावा आयोजित केला जात आहे. मागील वर्षात ४५ विवाह जुळविण्यात यश आले असून, यामध्ये अनेकांचे लग्न होऊन संसार स्थिरावले आहेत.

# स्टार्टअप ऑलिम्पियाड २०२६ मध्ये अहमदनगर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याची उल्लेखनीय कामगिरी

**उद्धव मनियार याला द्वितीय क्रमांक; पर्यावरणपूरक स्टार्टअपला मिळाले यश**



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** बीपीएचई सोसायटीच्या अहमदनगर महाविद्यालयातील बीबीए विभागाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थी उद्धव राहुल मनियार याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित 'स्टार्टअप ऑलिम्पियाड २०२६' या प्रतिष्ठित स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

विद्यार्थ्यांमधील उद्योजकता, नवकल्पना आणि स्टार्टअप संस्कृतीला चालना देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटीने या भव्य स्पर्धेचे आयोजन केले होते. पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक येथे आयोजित बूट कॅम्पपासून या स्पर्धेची सुरुवात झाली होती. या स्पर्धेत सुमारे ६ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी सादर करण्यात आलेल्या ६३२ संकल्पनांमधून केवळ ५० स्टार्टअप्सना अंतिम 'इन्व्हेस्टमेंट रेडी' टप्प्यासाठी निवड करण्यात आली होती.

या स्पर्धेत उद्धव मनियार याने '' या आपल्या स्टार्टअप संकल्पनेसाठी द्वितीय क्रमांक पटकावला. या स्टार्टअपद्वारे प्लास्टिक कचऱ्यापासून पर्यावरणपूरक व टिकाऊ बांधकाम पॅनल तयार करण्याचे अभिनव मॉडेल सादर करण्यात आले. पर्यावरण संरक्षण आणि कचरा व्यवस्थापन या दोन्ही महत्त्वाच्या मुद्द्यांना स्पर्श करणारी ही संकल्पना परीक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली.

या उल्लेखनीय यशाबद्दल उद्धवला ट्रॉफी तसेच १५,००० रुपयांचे प्री–सीड फंडिंग स्वरूपात पारितोषिक प्रदान करण्यात आले. या प्रकल्पासाठी त्याला बीबीए विभाग प्रमुख डॉ. तुशिता अय्यर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. दरम्यान, या यशाबद्दल अहमदनगर महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. आर. जे. बार्नबस यांनी उद्धव मनियार याचा सत्कार करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी विद्यार्थ्यांनी नवकल्पना आणि उद्योजकतेकडे वळावे, असे आवाहनही यावेळी केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्रशासकीय समन्वयक डॉ. नागवडे, प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी, उपप्राचार्य भालसिंग, नॉन–ग्रँट को–ऑर्डिनेटर डॉ. रज्जाक

# एमआयडीसी सह्याद्री चौक येथे अधिकृत रिक्षा स्टॉपचा शुभारंभ

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर एमआयडीसी परिसरातील सह्याद्री चौक येथे अधिकृत रिक्षा स्टॉपचा शुभारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक–मालक संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन, प्रमुख सल्लागार, सरचिटणीस अशोक औषीकर, नवनागापूर ग्रामपंचायत सदस्य बंडूनाना सप्रे व सागर सप्रे यांच्या हस्ते हा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी एमआयडीसी सह्याद्री चौक रिक्षा स्टॉप चे अध्यक्ष पंढरीनाथ सोनुले, उपाध्यक्ष अमोल कवडे, सल्लागार महादेव सानप, सचिव सुखदेव घोडके, खजिनदार सोमनाथ शिरसकर, नाथा गोरे, गोरख गोरे, रामदास तळेकर, संदीप सोडणार, निलेश पाडळे, अमोल फतरे, अंबादास ससाने, लक्ष्मण मोहोळकर, दादा गोल्हार,



शशिकांत पगारे, संजय भाकरे आदीसह चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अधिकृत रिक्षा स्टॉपमुळे प्रवाशांना सुरक्षित, नियोजनबद्ध व सोयीस्कर वाहतूक सुविधा उपलब्ध होणार असून परिसरातील वाहतूक व्यवस्थेतही सुधारणा होणार आहे. विशेषत. उन्हाळ्याच्या दिवसांत उष्णतेमुळे पायी चालणे कठीण होत असल्याने नागरिकांना रिक्षाची मोठ्या प्रमाणावर गरज भासते. अशा परिस्थितीत हा अधिकृत रिक्षा थांबा नागरिकांसाठी दिलासा ठरणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले म्हणाले की, एमआयडीसी परिसरात अधिकृत रिक्षा स्टॉपची मागणी अनेक दिवसांपासून होती. आज ती पूर्ण झाल्याचा आनंद आहे. या स्टॉपमुळे रिक्षाचालकांना निश्चित ठिकाण मिळाले असून प्रवाशांनाही सोयीस्कर सेवा मिळेल. भविष्यात अशा आणखी ठिकाणी अधिकृत रिक्षा स्टॉप सुरू करण्यासाठी संघटना प्रयत्नशील राहील. तसेच सर्व चालकांनी शिस्त, प्रामाणिकपणा व प्रवाशांशी नम्र वर्तन ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

# नेप्तीत रमजान ईद उत्साहात साजरी, हिंदू-मुस्लिम ऐक्याचा दर्शन

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथे मुस्लिम समाजाची रमजान ईद (ईद–उल–फित्र) उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त गावातील मुस्लिम बांधवांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ईद मिलन कार्यक्रमातून हिंदू–मुस्लिम ऐक्याचे प्रभावी दर्शन घडले. या कार्यक्रमात हिंदू समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होत मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

सकाळी शाही मस्जिदच्या मैदानावर मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज अदा केली. मौलाना मुनीर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज पठण करून देशात शांतता, सुख–समृद्धी व धार्मिक सलोखा टिकून राहावा, यासाठी प्रार्थना करण्यात आली, अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

संध्याकाळी आयोजित ईद मिलन कार्यक्रमात गावातील वाड्या–वस्तीवरील सर्व समाजातील नागरिक एकत्र आली होती. यावेळी हिंदू– मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडत होते . यावेळी सर्वांनी पारंपरिक शीरखुर्माचा आस्वाद घेत एकमेकांप्रती प्रेम व आपुलकी व्यक्त केली.



यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण होळकर, माजी उपसरपंच फारुख सय्यद ,जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवाजी होळकर, माजी पं. स. सदस्य देवा होले , सरपंच संजय अशोक जपकर, रामदास फुले, माजी उपसरपंच संजय आसाराम जपकर , दादू चौगुले, जालिंदर शिंदे ,चेअरमन सुरेंद्र होळकर , बाबूलाल सय्यद, मार्केट कमिटीचे माजी संचालक वसंतराव पवार, प्रा. एकनाथ होले, मौलाना मुनीर सय्यद, ग्रामपंचायत सदस्य बंडू जपकर, बाबासाहेब होळकर ,उमर सय्यद, सुरेश कदम, जावेद सय्यद ,रमीज सय्यद वाजीद सय्यद, व्हा. चेअरमन सादिक पवार, गुलाब सय्यद, बबन सय्यद, जमीर सय्यद, मेहबूब सय्यद, सादिक सय्यद ,मुक्तार सय्यद, नौशाद शेख, सिकंदर शेख, सलीम सय्यद, युनूस सय्यद, हन्सार सय्यद, कयूम सय्यद, उमर सय्यद, नावेद सय्यद, आदिल सय्यद, परवेज सय्यद, बादशाह सय्यद, रफिक सय्यद, एजाज सय्यद, इम्रान सय्यद ,हुसेन सय्यद ,इरशाद शेख, अशोक जपकर, अंबादास जपकर ,दादाभाऊ होळकर ,मच्छिंद्र जपकर ,भास्कर जपकर , अतुल जपकर, पोलीस पाटील अरुण होले, अजर सय्यद, दानिश सय्यद आदींसह नाले हैदर यंग पार्टी, दोस्ती तरुण मंडळाचे कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रमजाननिमित्त पोलीस बांधवांना अनोखी भेट



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** रमजान ईदच्या पावन निमित्ताने कोठला येथील ईदगाह मैदानावर स्टुडंट्स इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया, अहमदनगर यांच्या वतीने आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दिवसरात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांना गुलाब पुष्प, अल्पोपहार तसेच पुस्तकांची भेट देण्यात आली.

या उपक्रमातून पोलीस प्रशासनाबद्दल आदर व्यक्त करत समाजात बंधुभाव, एकात्मता आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्याचा संदेश देण्यात आला. ईदच्या आनंदाच्या क्षणी विविध घटकांना एकत्र आणण्याचा हा प्रयत्न विशेष होता.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपाधीक्षक दिलीप टिपरसे, कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड तसेच तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या प्रसंगी पोलीस अधिकारी व मान्यवरांना महात्मा फुले आणि इस्लाम अंतिम पैगंबर मुहम्मद (स) (जीवन चरित्र)'', ''इस्लामी संस्कृती'' (साने गुरुजी) तसेच ''इस्लाम आर्ट ऑफ लिव्हिंग'' ही पुस्तके भेट स्वरूपात देण्यात आली. या पुस्तकांमधून सामाजिक मूल्ये, नैतिकता व मानवी एकात्मतेचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच यावेळी नमाज साठी आलेल्या भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

या कार्यक्रमात स्टुडंट्स इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इंडियाचे उमेर शेख, जैद खान, मुनव्वर शेख, अरबाज शेख, कैफ शेख, कॉ. फिरोज शेख, जहीर सय्यद,उमैर मुनाफ शेख, साहेबान जहागीरदार, हमजा शेख, सुफियान सय्यद, कामरान शेख, ताहा शेख, झाहिद शेख, जुबेर शेख आदींसह युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

संपूर्ण रमजान महिन्यात शहरात शांतता, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



विराट हिंदू संमेलनानिमित्त माळीवाडा परिसर येथून भव्य कलश शोभायात्रा काढण्यात आली यावेळी सरलाबेट चे हभप रामगिरी महाराज यांची उपस्थिती होती यावेळी त्यांचे औक्षण करण्यात आले (छाया – राजू खरपुडे ,नगर)

# पुष्पगुच्छ नको, वृक्ष द्या; पर्यावरण संवर्धनासाठी पिंपरकणेत न्यायाधीशांचा साद

## मुठभर धान्य, घोटभर पाणी उपक्रमातून पक्ष्यांसाठी दातृत्वाचा ओलावा; निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** कोरोनाच्या भीषण काळात आपण सर्वांनी ऑक्सिजनचे महत्त्व रक्ताच्या नात्याने अनुभवले आहे. जर पुढील पिढीला शुद्ध श्वास द्यायचा असेल, तर आज केवळ झाडे लावून चालणार नाही, तर ती पोटच्या मुलाप्रमाणे जगवावी लागतील. इथून पुढे लग्न समारंभ किंवा वाढदिवसाला पाहुण्यांना फुलांचे गुच्छ देण्याऐवजी जिवंत झाड भेट देऊन त्याचे जतन करण्याची संस्कृती रुजवा,'' असे आवाहन दिवाणी न्यायाधीश मा. श्री. एस. यु. न्याहारकर यांनी केले.

पिंपरकणे (ता. अकोले) येथे निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित एक दिवसीय कार्यशाळा व अभ्यास दौऱ्याच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

आदिवासी संस्कृतीचा जागर कार्यक्रमाची सुरुवात २१ मार्च रोजी भंडारदरा धरण परिसरातून झाली. येथे निसर्ग मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी धरण परिसरातील जैवविविधतेचा अभ्यास केला. आदिवासी संस्कृती, तिथली जीवनशैली आणि पर्यावरणाचे अतूट नाते यावर सखोल विचारविनिमय करण्यात आला. निसर्गाच्या सानिध्यात राहून पर्यावरण रक्षणाची शपथ यावेळी घेण्यात आली.

प्रभातफेरी आणि मुठभर धान्य-घोटभर पाणी उपक्रम

२२ मार्च रोजी सकाळी पिंपरकणे ग्रामीण भागात भव्य प्रभातफेरी काढण्यात आली. उन्हाळ्याच्या तीव्र झळा लक्षात घेता, मुक्या पाखरांसाठी मुठभर धान्य, घोटभर पाणी हा संवेदनशील उपक्रम राबवण्यात आला. यावेळी ग्रामस्थांना आणि विद्यार्थ्यांना मातीच्या भांड्यांचे (परळ) वाटप करून घराच्या छतावर किंवा झाडांवर पक्ष्यांसाठी पाणी ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. या जनजागृतीला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रम प्रसंगी रफिक कादरी यांनी संभाजीनगर वरून आणलेले पिंपळाचे दहा फुटाचे झाड मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून व महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमात कुठल्याही प्लास्टिक वस्तूचा वापर केला गेला नाही व मान्यवरांचे स्वागत,सत्कार विशाल व वृक्ष देऊन करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे राज्याध्यक्ष प्रमोदजी सुभाष मोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक प्रभाकर म्हस्के, माजी विक्रीकर उपायुक्त () वसंतराव पिचड, वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) डी. डी. पडवळे, पोलीस उपनिरीक्षक किशोर पवार, वनपाल शंकर लांडे, आणि जी. आर. आढळ यांनी उपस्थित ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात प्रमोद मोरे म्हणाले की, निसर्ग वाचला तरच मानव वाचेल. आपण निसर्गाचे देणे लागतो या भावनेतून प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते मोठे करावे. यावेळी त्यांनी मंडळाच्या भविष्यातील वाटचालीवर प्रकाश टाकला.

ही पर्यावरण चळवळ यशस्वी करण्यासाठी प्रा.महेश पाडेकर आणि किसन अमृता पिचड यांनी विशेष परिश्रम घेतले.या कार्यक्रमाला कार्याध्यक्षा छायाताई राजपूत, निर्मला म्हस्के,लतिका पवार, अनिल लोखंडे, संजय गायकवाड, रामनाथ भोजने, बाळासाहेब डोंगरे, नानासाहेब गोफने, चंद्रकांत भोजने, बाळासाहेब ढोले, मुख्याध्यापक विलास सावंत,प्राचार्य संजय कडलक,शोभा काळे, रफिक कादरी, सखाराम मेसे, विजय पांडे, सुधाकर शेटे, राहुल राऊत, शरद कडलक, गणेश सगभोर, संतोष नवले, अमोल तळेकर, मदन राजपूत, सरपंच अनुसया ठिगळे, नामदेव जगदाळे, संजय बारंगळे, दिगंबर पुराने, सोपान वायाळ, वर्षा घुले, पद्मा राजपूत, रावसाहेब धोत्रे, भारत उगाडे, सुंदर करंडे, तुकाराम जाधव, सावळे सर, विश्वनाथ चौधरी, गणपत पिचड, कैलास ठिगळे, अरुण ठिगळे, अरुण पिचड, मनोहर पिचड, तानाजी सावळे, पत्रकार शांताराम काळे, संजय देशमुख यांसह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक विलास सावंत यांनी केले. सूत्रसंचालन प्रसिद्धीप्रमुख महेश पाडेकर यांनी, तर आभार प्रदर्शन चंद्रशेखर हासे यांनी मानले.

# नियोजनबद्ध व दर्जेदार विकास कामांमुळे शहर विकासाला गती – आ. संग्राम जगताप

## प्रभाग क्र.२ निर्मल नगर संत वामनभाऊ कॉलनी येथे रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहराचा विकास कामांच्या माध्यमातून कायापालट करण्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून विविध विकास कामांसाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून नियोजनबद्ध व दर्जेदार विकास कामांमुळे शहर विकासाला गती मिळाली आहे. पूर्वी शहराला 'खेडे' म्हणून संबोधले जात होते, मात्र आता नागरिकच शहराचा उल्लेख विकसित शहर म्हणून करू लागले आहेत. सर्वांच्या सहकार्यामुळेच विकासाचे मोठे प्रकल्प मार्गी लागत असून निर्मल नगर हा शहराचा शेवटचा भाग असतानाही या परिसरातील मूलभूत प्रश्नांपासून सर्वच विकास कामे मार्गी लावण्यात आली आहेत. जमिनीखालील कामे पूर्ण केल्यानंतरच रस्ता कॉंक्रिटीकरणाची कामे हाती घेतली असून त्यामुळे ही कामे टिकाऊ राहतील व पुन्हा पुन्हा दुरुस्तीची गरज भासणार नाही. पुढील अनेक वर्षांचा विचार करून शहरामध्ये विकास कामे सुरू असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

प्रभाग क्र.२ मधील निर्मल नगर संत वामनभाऊ कॉलनी येथे रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला.

यावेळी नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, महेश तवले, माजी नगरसेवक विनीत पाऊलबुद्धे, सामाजिक कार्यकर्ते सुनील त्रिंबके, नगरसेवक विशाल नाकाडे, नामदेव कांबळे, रवींद्र डहाळे, स्वाती आव्हाड, प्रशांत कोळपकर, किसन लांडे, सचिन आव्हाड, राहुल लांडे, भगवान वामन, भगवान गर्जे, महादेव गर्जे, अंबादास दहिफळे, रोहिदास सांगळे, सुनीता डहाळे, शारदा गर्जे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बाळासाहेब पवार म्हणाले की, माजी नगरसेवक विनीत पाऊलबुद्धे यांच्या प्रयत्नातून संत वामनभाऊ कॉलनीतील रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न मार्गी लागला आहे. हा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता व नागरिकांकडून वारंवार मागणी होत होती. आता हे काम पूर्णत्वाकडे जात असून दर्जेदार कामे करून घेण्याची जबाबदारी सर्वांची आहे. प्रभाग क्रमांक दोनचा विकास कामांमधून कायापालट होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

नगरसेवक निखिल वारे म्हणाले की, अहिल्यानगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असताना विकासकामे मार्गी लागणे कठीण होते. मात्र आमदार संग्राम जगताप यांनी राज्य सरकारच्या माध्यमातून मोठा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे शहरातील सर्वच भागात विकासकामांना गती मिळाली आहे. निर्मल नगर परिसरातील विविध रस्त्यांची कामे पूर्ण होत असून हा शेवटचा रस्ता सुरू करण्यात आला आहे.

# आयुष्याचे उत्तर शोधण्यासाठी भगवान महावीरांची पंचसूत्री उपयुक्त – प्रा.गणेश लोळगे

## भगवान महावीर व्याख्यानमालेचा आनंदधाममध्ये उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आपल्या आयुष्याचे उत्तर शोधण्यासाठी भगवान महावीरांची पंचसूत्री उपयुक्त ठरेल, असा विश्वास प्रा.गणेश लोळगे (कोल्हापूर) यांनी व्यक्त केला.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट पू.श्री.आनंदऋषीजी महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे पूज्य आदर्श ऋषीजी म .सा यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचा शुभारंभ करताना आयुष्याला द्यावे उत्तर या विषयावर ते बोलत होते. सिमा मुनोत यांनी स्वागत केले. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी वक्त्याचा परिचय करून दिला. श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सुरेश कटारिया, संतोष गांधी, सिमरन मुनोत आदी उपस्थित होते. सपना कटारिया यांनी आभार मानले.

प्रा. लोळगे पुढे म्हणाले, अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य आणि अपरिग्रह ही भगवान महावीरांची पंचसूत्री आयुष्याचे उत्तर शोधण्यासाठी उपयुक्त ठरणारी तसेच मन:शांती मिळवून देणारी आहे. प्रत्येकाच्या आयुष्यातील प्रश्न वेगवेगळे असतात. प्रत्येकाच्या आयुष्याची प्रश्नपत्रिका वेगळी असते. आपल्या प्रश्नाचे उत्तर आपल्यालाच शोधावे लागते. आपण उत्तर कसे शोधतो? यावर समाधान अवलंबून असते.

आपल्याला जे क्षेत्र आवडते त्या क्षेत्रात जीवनभर काम करावे. लोक माझ्याबद्दल काय विचार करतात? यापेक्षा मी माझ्या आयुष्यासाठी काय करू शकेल? हे समजले तर आयुष्याचे उत्तर निश्चित सापडते.

दुसऱ्यांशी तुलना करत आपण आपला आनंद हरवत चाललो आहोत. दिवसातील दहा ते अठरा तास स्क्रीन टाईममध्ये घालवणारे रीडिंग टाईमसाठी किती वेळ देतात? हा प्रश्न आहे. पुस्तक वाचायला शिकल्याने माणसं समजणे शिकता येते आणि आयुष्याचे उत्तर हाती येते.

आपण वस्तूंसाठी नाही तर वस्तू आपल्यासाठी आहेत, याचे भान असले पाहिजे. स्वतःवर प्रेम करायला शिकले पाहिजे. आई, वडील आणि मातृभूमीवर प्रेम केले तरच आयुष्याचे उत्तर सापडून जीवन समाधानी, सुखी, आनंदी होईल. दुसऱ्यांचे अश्रू पुसता आले तरच आपल्याला जीवनाचे मर्म कळेल. आपण वर्तमानात जगायचे विसरून गेल्याने जीवनात समस्या, ताण-तणाव निर्माण होत चालले आहेत. सकारात्मक भूमिकेतून वास्तववादी जगात जगता आले पाहिजे, असे सांगताना त्यांनी विविध प्रसंगाआधारे केलेले काव्य वाचन श्रोत्यांची दाद मिळवणारे ठरले.

विजयकुमारजी मुनोत यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्यानमालेच्या मुख्य प्रायोजक श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) आहेत. व्याख्यानमालेच्या शुभारंभ दिनी स्त्री-पुरूष श्रोत्यांची उपस्थिती लक्षवेधी होती.

# 'प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून होणे गरजेचे' : मनपा आयुक्त यशवंत डांगे

## नगरमधील पहिल्या सीबीएसई मराठी शाळेची घोषणा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–**अहिल्यानगर मधील पहिली प्रस्तावित सीबीएसई मराठी शाळा म्हणून 'पालवी शिशुविहार' घोषणा, सावेडीमधील शुभमंगल कार्यालय येथे, 'म-मराठीचा' या सांस्कृतिक तथा बालवर्ग पदवीदान समारंभात करण्यात आली. गेले १० वर्षे सुरु असलेल्या पालवी शिशुविहार मधील बालवर्ग पूर्ण करून इयत्ता पहिलीत प्रवेश करणाऱ्या मुलांना येथे पदवी प्रदान करण्यात आली. सदर कार्यक्रमास नगरचे मनपा आयुक्त यशवंत डांगे, ज्ञान प्रबोधिनी निगडी येथील आदित्य शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डांगे म्हणाले 'अभ्यासातील मूळ संकल्पना स्पष्ट होण्याच्या दृष्टीने मुलांना मातृभाषेतून शिक्षण देणे महत्वाचे असते. अशा विचाराने सध्याच्या काळात सीबीएसई मराठी सुरु करण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.'

तसेच शिंदे म्हणाले 'सध्याच्या शिक्षण पद्धतीने केवळ यंत्रवत पदवीधारक (डिग्री होल्डर) तयार होत आहेत. नवीन शैक्षणिक धोरण अवलंबून चालणाऱ्या, मुलांचे संपूर्ण व्यक्तिमत्व घडवणाऱ्या पालवी शिशुविहार सारख्या शाळांची निश्चितच समाजात आवश्यकता आहे.' यावेळी व्यासपीठावर अशोक मुथा, राजेंद्र सोनार, शरद झोटिंग, रवींद्र करंदीकर, सदाशिव उपाले, अरुण कुलकर्णी, गंधे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या मुख्य आचार्या मुग्धा घोटणकर तथा सौ. चिन्मयी यांनी केले. कार्यक्रमाची व्यवस्था अमित मुथा, गणेश झंवर आणि अनिकेत घोटणकर यांनी पाहिली.

औपचारिक कार्यक्रमानंतर शाळेतील मुलांच्या, पालकांच्या आणि शिक्षकांच्या सहभागाने सांस्कृतिक कार्यक्रम 'म-मराठीचा' संपन्न झाला. आजी-माजी तसेच भविष्यातील अनेक पालकांनी या कार्यक्रमास हजेरी लावली. तसेच परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

(पान १ वरुन)

### खरातच्या कौतुकासंदर्भात पोपटराव पवारांचे स्पष्टीकरण

इतर वक्त्यांच्या बोलण्यातून तो विषय आला, युरोपात पोलीस यंत्रणाचा याचा वापर करतात असेही तिथंच समजलं होतं. मला जरी काही कल्पना असती तर तिथं गेलोच नसतो, असेही पवार यांनी म्हटले आहे.

### शिक्षक समाजाचे खरे शिल्पकार - आमदार काशिनाथ दाते

केले की, ''मतदारसंघातील प्रत्येक लहान-मोठ्या प्रश्नांकडे मी बारकाईने लक्ष देत असून विधानभवनातील माझी उपस्थितीही शंभर टक्के आहे. शिक्षकांच्या अडचणींबाबत मला पूर्ण जाणीव आहे आणि योग्य वेळी त्यावर निश्चितपणे उपाययोजना करण्यात येईल.'' कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध मान्यवरांच्या वतीने समाजातील शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि शहीद जवान मदत निधी उपक्रमामुळे कार्यक्रमाला सामाजिक बांधिलकीची जोड मिळाली. या सोहळ्यामुळे शिक्षक, विद्यार्थी व समाज यांच्यातील नातेसंबंध अधिक दृढ होत असून ''शिक्षक हेच समाजाचे खरे शिल्पकार'' हा संदेश अधोरेखित झाला.

चौकट : प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळत असला, तरी माध्यमिक शिक्षकांवरील वाढता प्रशासकीय व शैक्षणिक ताण कमी करण्यासाठी सामूहिक पातळीवर ठोस प्रयत्न होणे गरजेचे आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांच्या उपस्थितीत या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले जाईल, अशी अपेक्षा आहे. त्यांच्या कार्यकाळात तालुक्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांवरील अनावश्यक दडपण कमी झाले असून कामकाज अधिक पारदर्शक झाले आहे. यापुढील काळातही हीच सकारात्मक व समाजाभिमुख दिशा कायम राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

– डॉ. भाऊसाहेब खिलारी

### पैठणमध्ये वैद्यकीय निष्काळजीपणाचा आरोप; शस्त्रक्रियेनंतर महिलेची दृष्टी गेल्याचा दावा

पुढील उपचाराचा खर्च उचलण्याचे आश्वासन देत रुग्णाला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचा दावा करण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात केवळ काही रक्कमच देण्यात आल्याचे भारद्वाज यांनी सांगितले. उर्वरित खर्च स्वतः करावा लागल्यामुळे कुटुंबावर आर्थिक ताण आला आहे. तक्रारदाराच्या मते, आतापर्यंत सुमारे १ लाख ७५ हजार रुपयांचा खर्च झाला असून महिलेची प्रकृती अद्याप चिंताजनक आहे. संबंधित रुग्णालय व डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळेच ही गंभीर परिस्थिती उद्भवल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, या प्रकरणात संबंधित डॉक्टर किंवा रुग्णालय प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. पोलिसांकडून तक्रारीची नोंद घेऊन पुढील चौकशी सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे.

### युद्धाचा शेअर बाजाराला फटका

इराण यांच्यातील युद्धात आता ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले होऊ लागले आहेत. होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे सुरु नसल्यानं जगभरातील क्रूड ऑईलच्या दरात वाढ झाली आहे. याचा फटका देखील भारताला बसत आहे. क्रूड ऑईलचे दर ७० डॉलर प्रति बॅरलवरुन ११० डॉलर प्रति बॅरलच्या वर पोहोचले आहेत. भारत मोठ्या प्रमाणात खनिज तेलाची आयात करत असल्यानं भारताचा तेल खरेदीसाठी होणारा खर्च वाढला आहे.

क्रूड ऑईलच्या दरात झालेली वाढ आणि रुपयाचं होत असलेलं अवमूल्यन यामुळं विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून अमेरिका आणि इराण युद्ध सुरु झाल्यापासून १ लाख कोटी रुपये काढून घेतले आहेत. एनएसडीएलवरील डेटानुसार गुंतवणूकदारांनी १०३९६७ कोटी भारतीय बाजारातून काढून घेतले आहेत. आशियातील मुख्य बाजारात जपानचा निक्केई आणि कोरियाचा कोस्पी या निर्देशांकात ६ टक्क्यांची घसरण झाली आहे. यूरोपमधील शेअर बाजारांमध्ये २ टक्क्यांची घसरण देखील झाली आहे.

### महाराष्ट्राचे अध:पतन झाल्याची भीती वाटते

राज ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेचा दाखला दिला. ''जिथे लोकमान्य टिळक गीतारहस्य लिहितात आणि यशवंतराव चव्हाणांसारखे नेते तर्कतीर्थांशी संवाद साधतात, त्याच महाराष्ट्रातले आजचे नेते तर्काला तिलांजली देऊन कुठल्यातरी अजब तीर्थासाठी खरातसारख्याच्या भजनी लागतात, हे भीषण आहे,'' असे त्यांनी म्हटले आहे. विशेषतः २०१३ मध्ये अंधश्रद्धा निर्मूलन विधेयक पारित करणाऱ्या आमदारांपैकीच काही जण या प्रकरणात अडकले असण्याची शक्यता त्यांनी वर्तवली असून, हा मोठा विरोधाभास असल्याचे स्पष्ट केले.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी बालयोगी उमेशनाथ महाराज यांची भेट

निगडित क्रीमी लेयर आरक्षण, तसेच स्वच्छता क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या अडचणी व समस्यांवर सखोल विचारविनिमय करण्यात आला. या सर्व मुद्द्यांवर पंतप्रधानांनी गांभीर्याने लक्ष देत सकारात्मक भूमिका दर्शविल्याचे सांगण्यात आले. तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छतेचे महत्त्व, सामाजिक समरसता आणि शिक्षणाचा प्रसार या विषयांवरही चर्चा झाली. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. ही भेट सामाजिक, धार्मिक व विकासात्मक विषयांवर सकारात्मक संवाद साधणारी ठरल्याचे अहिल्यानगरचे भाजप शहर जिल्हा उपाध्यक्ष नरेश चव्हाण यांनी सांगितले.

### शेती, पशुपालन आणि पक्षी संगोपनाचा अनोखा मेळा – आ. काशिनाथ दाते सर

प्रदर्शनात पाहायला मिळाले. काही पशुपालकांकडे आठ-दहा गायींचे गोठे आहेत, तर काहींनी उत्कृष्ट जातीचे बैल व जनावरे जोपासले आहेत. पिंपळनेर येथील दिंडीच्या रथाची बैलजोडी तसेच इतर उत्कृष्ट पशुधन पाहून आनंद झाला. या प्रदर्शनामुळे पशुपालन क्षेत्राला नवी दिशा मिळेल.'' प्रदर्शनाच्या आयोजनाबाबत समाधान व्यक्त करत त्यांनी सांगितले की, ''अशा प्रकारचे उपक्रम शेतकऱ्यांना प्रेरणा देणारे ठरतात. कमी जलस्रोतांमध्येही चाऱ्याचे नियोजन करून पशुधन टिकवणाऱ्या शेतकऱ्यांचे कार्य आदर्श आहे. शासनाच्या विविध योजनांमधून पशुपालकांना सातत्याने मदत मिळत असून या क्षेत्राला बळकटी देण्याचे काम सुरू आहे.'' पशुप्रेमाबाबत बोलताना आमदार दाते म्हणाले की, ''जनावरांचे संगोपन करताना आर्थिक भार व कष्ट मोठे असतात, मात्र छंद आणि प्रेमामुळे शेतकरी त्यांना मुलांप्रमाणे जपतो. हाच खरा पशुप्रेमाचा अर्थ आहे.'' शेवटी त्यांनी पशुसंवर्धन विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक करत सर्व सहभागी पशुपालकांचे अभिनंदन केले व त्यांना शुभेच्छा दिल्या. या प्रदर्शनामुळे तालुक्यातील पशुपालकांना प्रोत्साहन मिळून पशुपालन क्षेत्राच्या विकासाला चालना मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. अहिल्यानगर जिल्ह्यातील लोणी प्रवरा येथे दुधाळ व प्रजननक्षम जनावरांची पुढील पिढी तयार करण्यासाठी भ्रूणप्रत्यारोपण कार्यशाळा प्रभावीपणे सुरू आहे. पूर्वी पशुपालन हा केवळ जोडधंदा म्हणून केला जात होता, मात्र आता बदलत्या काळानुसार गावागावात पशुसंवर्धन उद्योजक निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. आमदार काशिनाथ दाते यांनी जिल्हा परिषदेत असताना आपत्तीग्रस्त पशुपालकांसाठी गायीसाठी १० हजार व शेळ्या-मेंढ्यांसाठी ३ हजार रुपयांची मदत देण्याचा घेतलेला निर्णय कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. शासनासोबत लोकप्रतिनिधींचेही असेच सहकार्य राहिले, तर पशुपालकांना भविष्यात निश्चितच चांगले दिवस येतील, असा विश्वास आहे.

-डॉ. तुंभारे मा. उपायुक्त पशुसंवर्धन

# गुढी पाडव्याच्या निमित्ताने दिव्यांग बांधवांना किराणा वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव–** संवत्सर येथे श्री साई आधार फाउंडेशन व श्रीराम दिव्यांग सेवा प्रतिष्ठान (अपंग आश्रम) यांच्या वतीने गुढी पाडवा निमित्त, रविवार दि. २२ मार्च २०२६ रोजी दिव्यांग बांधवांना किराणा वस्तूंचे वाटप करण्यात आले. समाजातील गरजू व अपंग व्यक्तींना आधार मिळावा, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात सुमारे १०० दिव्यांग बांधवांनी सहभाग घेतला. किराणा वाटपामुळे लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त करत संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. श्रीराम दिव्यांग सेवा प्रतिष्ठान हे आश्रम वेळोवेळी दिव्यांगांना मदतीचा हात देत असून, यापूर्वीप्रमाणेच यंदाही त्यांनी आपला विश्वास जपला आहे. या उपक्रमातून समाजातील गरजू घटकांना दिलासा मिळाला.

यावेळी आश्रमाचे अध्यक्ष म्हणाले, ''देवाने आपल्याला आयुष्यात जे काही दिले आहे, त्यातील थोडा वाटा अशा व्यक्तींना द्यावा, ज्यांना आपल्या तुलनेत खूप कमी मिळाले आहे. आपण आज आहोत, उद्या नसू शकतो, त्यामुळे नेहमी दिव्यांग व गरजू व्यक्तींना मदत करत राहा.'' अशा प्रेरणादायी विचारांनी आणि सामाजिक बांधिलकीच्या संदेशाने हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.